वाचले : १.मा.महापालिका सभा ठराव क्र.३१२८, दि.२४/१/१९९८
२.क्र.भूजि/०९/कावि/०९/२०२०, दि. ०२/०१/२०२०.
३.क्र.भूजि/०९/कावि/७८/२०२१, दि.१०/०२/२०२१
४.क्र.भूजि/०९/कावि/२८१/२०२१, दि.०९/०९/२०२१
५.क्र.भूजि/०९/कावि/४०६/२०२१, दि.२७/१२/२०२१
६.मा. आयुक्त यांचेकडील दि.२७/१२/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र.भूजि/०९/कावि/४०७/२०२१
दि.२७/१२/२०२१

**विषय : पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना सन्मा. महापुरुषांची नावे, क्रमांक देणेबाबत...**

आदेश,

वाचले क्र.१ अन्वये क्षेत्रिय कार्यालयांचे अधिनस्त कार्यक्षेत्रातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरणाबाबतचे अधिकार प्रत्यावर्तित करण्यात आलेले आहेत. तथापि प्रभाग समित्यांमार्फत रस्त्यांना व सार्वजनिक जागांना दिलेल्या नामकरणामध्ये बदल करुन अन्य नावे दिली जात असल्याचे निदर्शनास आल्याने वाचले क्र.२ अन्वये नामकरणाबाबत स्वतंत्र धोरण निश्चित होईपर्यंत नामकरण कार्यवाहीस स्थगिती देण्यात आलेली होती. वाचले क्र. ३ अन्वये मा. उपमहापौर व पालिका अधिकारी यांची समिती गठीत करणेत आलेली होती. नामकरण विषयाबाबत सखोल अभ्यास/विवेचन करुन तसा अहवाल सदर समितीने सादर करण्यावावत नमूद केलेले होते. त्यानुषंगाने सदर समितीने नामकरण कार्यवाही करताना धोरणाबाबत शिफारशी केल्या आहेत. वाचले क्र.५ अन्वये नामकरणाबाबतच्या विषयावर मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली निर्णय होऊन मान्य शिफारशीं नुसार नामकरणाबाबतची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयांनी खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार <u>"कार्यपद्धती"</u> अनुसरावयाची आहे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतींचे नामकरणाबाबत शिफारशी :-**

१. महानगरपालिकेच्या मिळकतींना यापूर्वी प्रभाग समिती अथवा मनपाने ठराव करुन जी नावे देण्यात आलेली आहेत त्यामध्ये वदल करण्यात येऊ नये.
२. मनपाने विकसित केलेले क्रीडा प्रयोजनार्थ मोठे खेळाचे मैदान, हॉल, जलतरण तलाव, मिळकतींना त्या खेळाशी योगदान असणाऱ्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त खेळाडूचे नामकरण करण्यात यावे.
३. मनपाने विकसित केलेल्या क्रीडा प्रयोजनार्थ मध्यम, लहान आकाराच्या मिळकतींना, मैदानांना, त्या खेळाशी योगदान असणाऱ्या राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त खेळाडूचे नामकरण करण्यात यावे.
४. मनपाच्या शाळांना/स्पर्धा परीक्षा केंद्रांना आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय /राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त शैक्षणिक क्षेत्रात योगदान असणाऱ्या व्यक्तीचे नामकरण करण्यात यावे.
५. मनपाने विकसित केलेले सांस्कृतिक भवन, नाटयगृह, कलादालन, शहराच्या सौंदर्यात, वैभवात भर घालणाऱ्या मिळकतींना सांस्कृतिक, सामाजिक, कला, नृत्य, समाजसेवा या क्षेत्रांमध्ये योगदान असणाऱ्या राष्ट्रीय/राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त व्यक्तीचे नामकरण करण्यात यावे.
६. मनपा कार्यक्षेत्रातून जाणारे रस्ते, महामार्गातील चौक, पुल, बसथांबे यांना राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक सेवा केलेल्या व्यक्ती, साधु, संत, राजे, महाराजे यांचे नामकरण करण्यात यावे.

७. मनपा कार्यक्षेत्रातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गास, पुलास, रस्त्यास, चौक, बसथांबे यांना एकाच महापुरुषाचे नामकरण करण्यात येऊ नये. त्यामुळे पत्ता शोधण्यात अडचण निर्माण होणार नाही.

८. मनपाने वैद्यकीय प्रयोजनार्थ बांधलेल्या/उभारलेल्या इमारतींना वैद्यकीय क्षेत्रात योगदान, उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचे नामकरण करण्यात यावे.

९. मनपाने विकसित केलेल्या इतर इमारती, मंडई, अंतर्गत रस्ते, चौक, व्यापारी संकुल यांना सामाजिक कार्यात योगदान असलेल्या व्यक्तींचे नामकरण करण्यात यावे.

१०. मनपाच्या एकाच इमारतीस, मिळकतीस दोन महापुरुषांचे, व्यक्तींचे नामकरण करण्यात येऊ नये.

११. कोणत्याही मिळकतीला धार्मिक/जातीय तेढ निर्माण होईल असे नामकरण करण्यात येऊ नये.

१२. शहरातील प्रत्येक गावाचा विचार करता गावात वार्डात राष्ट्रीय खेळाडू मिळणार नाहीत, त्यामुळे स्थानिक उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्तींच्या नावांची शिफारस करता येईल.

१३. यापुढे ज्यांनी कोणत्याही प्रकल्पास विना मोबदला जागा दिल्यास त्यांच्या सूचनेप्रमाणे/मागणीप्रमाणे प्रकल्पाला नावाबाबत विचार करता येईल.

१४. रुग्णालये, दवाखाने, इमारत १० वर्ष अथवा त्यापुढे स्वखर्चाने सक्षमपणे चालविण्यासाठी एखाद्या संस्थेने आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर मा.आयुक्त, मा.स्थायी समिती व मा.महासभेच्या मान्यतेने संबंधित संस्थेच्या विनंतीनुसार नामकरणाबाबत विचार करता येईल.

१५. नामकरणाबाबतचे सर्व प्रस्ताव दीर्घ मुदतीचे असावेत.

१६. पिंपरी चिंचवड ची एक जागतिक दर्जाचे शहर म्हणुन ओळख निर्माण होणेसाठी काही वास्तु, मुख्य रस्ते, मोठी उद्याने किंवा विशेष प्रकल्प यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम व्यक्तींचे नामकरण करण्याबाबत विचार केला जावा.

१७. ज्या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सदर मिळकत आहे त्या मिळकतीचे नामकरणाचे प्रस्ताव प्रभाग समितीमार्फत मंजुर करून प्रभाग समिती सचिवांनी महासभेच्या मंजुरीस्तव नगरसचिव कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावे. महासभेच्या मंजुरीनंतर आयुक्त यांचे प्रशासकीय आदेश निर्गत झालेनंतर प्रभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचेमार्फत सदर नामकरणाची फलक लावण्याची प्रक्रिया पुर्ण करावी.

१८. जी मालमत्ता दोन किंवा अधिक प्रभागात समाविष्ट असेल असा प्रस्ताव ज्या प्रभागात संबंधित मिळकतीचे जास्त क्षेत्र असेल त्या प्रभाग समितीमार्फत पाठविण्यात यावा.

१९. सदर नामकरण प्रस्तावाबाबत काही वाद निर्माण झाल्यास आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

**सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,** वाचले क्र.१ते ६ ला अधीन राहून क्षेत्रिय कार्यालयांकडील नामकरणाबाबतचे वाचले क्र.१ चे अधिकार पुर्ववत करुन यापुढे क्षेत्रिय कार्यालयांनी नामकरणाबाबतची कार्यवाही करताना उपरोक्त समाविष्ट अटी-शर्तींचा समावेश करुन कार्यपध्दतीचे पालन करणेकामी या आदेशान्वये मान्यता देत आहे.

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

प्रत : १)सर्व क्षेत्रिय कार्यालय
२/- सदर परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करणेत यावी.
२)नगरसचिव विभाग, स्थापत्य विभाग
२/- पुढील कार्यवाहीस्तव.